Pimpalner Education Society's
KARM. A. M. PATIL ARTS, COMMERCE AND
KAI. ANNASAHEB N. K. PATIL SCIENCE SENIOR COLLEGE,
PIMPALNER, TAL. SAKRI, DIST. DHULE.
e-mail: kamp_sr_college@yahoo.in
Phone: 02561-223010
Web: http://www.kampsrcollege.org.in
Offg. Prin. K. D. Kadam

Outward No: Date: / /202

**5.1.2 Capacity building and skills enhancement initiatives taken by the institution include the following**

1. Soft skills, 2. Language and communication skills, 3. Life skills (Yoga, physical fitness, health and hygiene), 4. ICT/computing skills

**Response:**

During academic year 2020-21 following activities were organized

| Sr. No. | Name of the activity | Date of organization | Page No. |
|---|---|---|---|
| 01 | University Level Online – 'Ahirani Poetry Competition' | 20/08/2020 | 2-9 |
| 02 | Teacher's Day | 05/09/2020 | 10-14 |
| 03 | Online Counselling Workshop on 'How to face Online Examination' | 17/09/2020 | 15-19 |
| 04 | Reading Motivation Day (Online) | 15/10/2020 | 20-24 |
| 05 | Marathi Bhasha Gaurav Din (Online) | 27/02/2021 | 25-29 |
| 06 | State Level Elocution Competition (Online) - Women's Day | 11/03/2021 | 30-36 |
| 07 | Online Workshop on 'Indian Birds, conservation and Bird watching Techniques'. | 23/03/2021 | 37-38 |
| 08 | National Yoga Day (Offline) | 21/06/2021 | 39-43 |

# ‘खानदेशस्तरीय खुली ऑनलाइन अहिराणी काव्यवाचन स्पर्धा व काव्य संमेलन- अहवाल

खानदेश कन्या कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव नामविस्तार दिनानिमित्त कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव व कर्म. आ. मा. पाटील कला, वाणिज्य व कै. अण्णासाहेब एन. के. पाटील विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय, पिंपळनेर यांच्या विद्यार्थी विकास विभागा मार्फत खानदेशस्तरीय खुली ऑनलाइन अहिराणी काव्यवाचन स्पर्धा दिनांक २० ऑगस्ट २०२०, वार गुरुवार रोजी आयोजित करण्यात आली.

या स्पर्धेचे उद्घाटन माननीय दादासो दिलीप रामू पाटील (व्य. प. सदस्य, क. ब. चौ. उ. म. वि., जळगाव) यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. याप्रसंगी अध्यक्षस्थानी कॉलेज कमिटीचे चेअरमन श्री. धनराज राजमल जैन तर प्रमुख अतिथी म्हणून जेष्ठ अहिराणी साहित्यिक श्री. सुभाष अहिरे, प्रा. एल. जी. सोनवणे तर परीक्षक म्हणून प्रा. डॉ. वा. ना. आंधळे व साहित्यिक श्री. रामदास वाघ हे उपस्थित होते.

अहिराणी भाषा ही सांस्कृतिक वैभव जतन करणारी भाषा आहे म्हणून या माय भाषेचे वैभव जतन करा असे प्रतिपादन माननीय दादासो प्रा. दिलीप रामू पाटील यांनी उद्घाटन प्रसंगी केले. विद्यापीठाच्या परिक्षेत्रामध्ये अशा प्रकाराचे अहिराणी काव्य स्पर्धा आयोजन करणारे पिंपळनेर महाविद्यालय हे पहिलेच महाविद्यालय आहे. ते पुढे म्हणाले की, अहिराणी ही लोकशाहीचा जिवंत झरा आहे. ती एकत्र कुटुंबाचा वारसा जपणारी, प्रेमळ, रसाळ, मधाळ भाषा आहे. पिंपळनेर महाविद्यालयाच्या या उपक्रमातून विद्यार्थ्यांमधील सृजनशील वृत्ती वाढीस लागून उत्तमोत्तम कवी निर्माण होतील. त्यांची ही पाऊलवाट आहे त्याचा निश्चितच महामार्ग होईल असा आशावाद त्यांनी व्यक्त केला. एका अशिक्षित माय माऊली बहिणाबाईना जे सुचलं ते जपलं आणि पुढे तिचे हे काव्य जगण्याचे तत्वज्ञान झाले. तिच्या या कार्याचा गौरव म्हणून विद्यापीठाला बहिणाबाई चौधरींचे नाव दिले गेले. जगाच्या इतिहासात एका अशिक्षित महिलेचे नाव विद्यापीठास देण्याची ही पहिलीच वेळ आहे असेही ते म्हणाले.

श्री. सुभाष अहिरे यांनी आपल्या मनोगतातून सांगितले की, जोपर्यंत आमच्या खानदेशी भाषिकाचा पेहराव, कष्टकऱ्यांचे दुःख, बापाचे कष्ट, मायचं जगणं हे पाठ्यपुस्तकांचे विषय होत नाही तोपर्यंत अहिराणी भाषेला न्याय मिळणार नाही. हा न्याय देण्याचा प्रयत्न पिंपळनेर महाविद्यालय करीत असल्याचे ते म्हणाले. ज्या दिवशी अहिराणी साहित्य संवर्धनाचा इतिहास लिहिला जाईल त्यात पिंपळनेर महाविद्यालयाचे नाव सुवर्ण अक्षरांनी लिहिलेले असेल, असेही ते म्हणाले.

प्रा. एल. जी. सोनवणे यांनी आपल्या मनोगतातून सांगितले की, मानवी विकासामध्ये भाषेचे मोठे योगदान असते. बोली भाषा ही प्रमाण भाषेपेक्षा प्राचीन आहे. संस्कृत साहित्यात जे मांडले आहे तेच जात्यावरच्या ओव्यांमध्ये आढळते. त्यामुळे अहिराणी ही समृद्ध भाषा आहे. परंतु काही शहरी किंवा शिक्षित लोक अहिराणी भाषिकाला गावंडळ, खेडवळ अथवा गावरान म्हणून हिणवत असतात. परंतु अहिराणी मध्ये सौंदर्य आहे, तिच्यात एक सांस्कृतिक वैभव दडलेले आहे. जात्यावरच्या ओव्यांमध्ये स्त्री-पुरुष समानता, लिंग - समभाव या बाबी आढळतात. यावरून त्यांच्या द्रष्टेपणाची कल्पना येते.

आपल्या अध्यक्षीय समारोपात श्री. धनराज शेठ जैन यांनी सर्व स्पर्धकांना शुभेच्छा दिल्यात. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे यांनी सादर केले. या काव्य संमेलनात सहभागी सर्व कवींच्या कवितांचा एकत्रित काव्यसंग्रह प्रकाशित करण्याचा महाविद्यालयाचा मानस आहे, असे त्यांनी प्रास्ताविकातून सांगीतले. याप्रसंगी परिक्षक प्रा. डॉ. वा. ना. आंधळे, श्री. रामदास वाघ, सि. गो. पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. अहिरे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

या स्पर्धेमध्ये नाशिक, जळगाव, धुळे व नंदुरबार या चारही जिल्ह्यांमधून एकूण २६ स्पर्धकांनी सहभाग नोंदविला. त्यात प्रथम क्रमांक सौ. प्रियंका अनिल पाटील, नवापूर (३०००/- रु. व प्रमाणपत्र), द्वितीय क्रमांक श्री. सुनिल अभिमन पाटील, फागणे (२०००/- रु. व प्रमाणपत्र), तृतीय क्रमांक विभागून श्री. संदीप देसले, लोणखेडे व कु. रुपाली चौधरी, पिंपळनेर (प्रत्येकी ५००/- रु. व प्रमाणपत्र) उत्तेजनार्थ विभागून श्रीमती लतिका चौधरी, दोंडाईचा व प्रा. जगदीश वाघ, नवापूर (प्रत्येकी २५१/- रु. व प्रमाणपत्र) या स्पर्धकांनी पटकावले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. राम पेटारे, प्रमुख अतिथींचा परिचय प्रा. डॉ. संजय खोडके यांनी केला तर आभार प्रदर्शन प्रा. एल. जे. गवळी यांनी मानलेत.

# माहितीपत्रक

कवयित्री बहीणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,

जळगाव संलग्नीत

पिंपळनेर एज्यूकेशन सोसायटी संचालित, नॅक पुर्नमुल्यांकन 'ब' श्रेणी प्राप्त

**कर्म. आ. मा. पाटील कला, वाणिज्य व कै. अण्णासो एन. के. पाटील विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय, पिंपळनेर, ता. साक्री. जि. धुळे (महाराष्ट्र)**

यांच्या आय. क्यु. ए. सी. व विद्यार्थी विकास विभागा मार्फत आयोजित

**AHIRANI LANGUAGE ONLINE POETRY COMPETITION**

खानदेश कन्या कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव नामविस्तार दिनानिमित्त

## 'खानदेशस्तरीय (धुळे, जळगाव, नंदुरबार) खुली ऑनलाईन अहिराणी काव्यवाचन स्पर्धा व काव्य संमेलन'









## खानदेश कन्या कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव नामविस्तार दिनानिमित्त 'खानदेशस्तरीय (धुळे, जळगाव, नंदुरबार) खुली ऑनलाईन अहिराणी काव्यवाचन स्पर्धा व काव्य संमेलन'

स्पर्धा दिनांक : २० ऑगस्ट २०२० | वार : गुरुवार

वेळ : सकाळी १०.३० वा. | स्थळ : झूम ॲप



स्पर्धेचे उद्‌घाटक
मा. दादासो दिलीप रामू पाटील
व्यवस्थापन परिषद सदस्य, क.ब.चौ.उ.म.वि, जळगाव



प्रमुख अतिथी
मा. प्रा. एल. जी. सोनवणे
माजी अध्यक्ष, मराठी अभ्यास मंडळ उमवि जळगाव



प्रमुख अतिथी
मा. श्री. सुभाष अहिरे
अहिराणी साहित्यिक, कवी, धुळे



कार्यक्रमाचे अध्यक्ष
मा. श्री. धनराज राजमल जैन
चेअरमन, कॉलेज कमिटी, पिं. ए. सो.

## काव्यवाचन स्पर्धेचे नियम:

1. काव्यवाचन स्पर्धेत कोणत्याही वयोगटाच्या स्पर्धकास सहभागी होता येईल, त्यासाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही.
2. स्पर्धेचे माध्यम अहिराणी भाषेतच असेल.
3. काव्य स्वरचित असावे.
4. काव्य स्वहस्ताक्षरात लिहून खालील इमेलवर सादर करावे. आपण पाठविलेल्या काव्याची निवड समितीमार्फत छाननी करून निवडक स्पर्धकांना सादरीकरणाची संधी दिली जाईल.
5. प्रत्येक स्पर्धकाला दोन काव्य सादर करण्याची संधी दिली जाईल.
6. दोन्ही काव्य सादरीकरणासाठी सहा मिनिटाचा कालावधी दिला जाईल.
7. काव्य हे ग्रामीण स्त्री, ग्रामीण शेतमजूर, ग्रामीण शेती, शेतकरी, पारंपारिक रूढी-परंपरा, चाली-रीती तसेच समाज प्रबोधन पर असावे.
8. अश्लील अथवा अनावश्यक काव्य सादर करण्यास परवानगी दिली जाणार नाही.
9. यशस्वी स्पर्धकांचे काव्य व काही निवडक काव्य एकत्रित करून त्यांचा काव्यसंग्रह महाविद्यालयीन स्तरावर प्रकाशित करण्यात येईल. सदरचा काव्यसंग्रह आपल्याला पीडीएफ स्वरुपात आपल्या इमेलवर पाठवण्यात येईल.
10. प्रथम तीन क्रमांकाच्या स्पर्धकांना खालील प्रमाणे पारितोषिके दिली जातील.
    - प्रथम क्रमांक तीन हजार रुपये व प्रमाणपत्र
    - द्वितीय क्रमांक दोन हजार रुपये व प्रमाणपत्र
    - तृतीय क्रमांक एक हजार रुपये व प्रमाणपत्र
11. प्रत्येक सहभागी स्पर्धकास प्रमाणपत्र देण्यात येईल.
12. सदर काव्यस्पर्धा ही झूम ॲप वर घेण्यात येईल.
13. परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील.
14. काव्य स्वरचित असल्याचा पुरावा म्हणून काव्य स्वहस्ताक्षरात लिहून त्यावर स्वतःचा फोटो व त्या बाजूला स्वतःची सही करावी. त्यानंतर सदर कागद स्कॅन करून आयोजक महाविद्यालयाकडे खालील इमेलवर पाठवावा.

**Email: kampahiranipoem@gmail.com**

### काव्य सादर करण्याची अंतिम तारीख १८ ऑगस्ट २०२०

**स्पर्धा दिनांक : २० ऑगस्ट २०२०** **वार : गुरुवार**

**वेळ : सकाळी १०.३० वा.** **स्थळ : झूम ॲप**

**महत्वाची सुचना:** स्पर्धकांनी नाव नोंदणी साठी खालील लिंक वर क्लिक करून स्पर्धेत सहभागी होण्याचा अर्ज भरून जमा करावा. तसेच प्रवेश अर्ज सबमिट केल्यानंतर त्या खालील दर्शविलेल्या व्हॉट्सॲप ग्रुप वर जॉईन व्हावे. म्हणजे त्या ग्रुप वर आपणाला वेळोवेळी स्पर्धेच्या सूचना व झुम ची लिंक देण्यात येतील.

### संयोजन समिती



डॉ. संजय पांडुरंग खोडके
(संयोजक, मो. क्र. 9420374077)



प्रा. एल. जे. गवळी
(सदस्य, मो. क्र. 9421889487)



डॉ. राम काशिनाथ पेटारे
(सदस्य, मो. क्र. 9423434804)



प्रा. जे. पी. अमृतकर
(सेवानिवृत्त, विशेष निमंत्रित)



प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे
(अध्यक्ष, संयोजन समिती)

# निकाल पत्रक



पिंपळनेर एज्यूकेशन सोसायटी संचालित, नॅक पुर्नमुल्यांकन 'ब' श्रेणी प्राप्त

**कर्म. आ. मा. पाटील कला, वाणिज्य व कै. अण्णासो एन. के. पाटील विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय, पिंपळनेर,** ता. साक्री. जि. धुळे (महाराष्ट्र)

**आणि**

**कवयित्री बहीणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

**यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित**

खानदेश कन्या कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव नामविस्तार दिनानिमित्त

**'खानदेशस्तरीय खुली ऑनलाईन अहिराणी काव्यवाचन स्पर्धा व काव्य संमेलन'**



## निकाल पत्रक




## आयोजक व संयोजक यांचेकडून निकाल घोषित

| क्रमांक | स्पर्धकांचे नाव | गाव | पारितोषिक | |
|---|---|---|---|---|
| प्रथम | सौ. प्रियंका अनिल पाटील | नवापूर | ३०००/- रु | प्रमाणपत्र |
| द्वितीय | श्री. सुनिल अभिमन पाटील | फागणे | २०००/- रु | प्रमाणपत्र |
| तृतीय विभागून | श्री. संदीप देसले | लोणखेडे | ५००/- रु | प्रमाणपत्र |
| तृतीय विभागून | कु. रुपाली चौधरी | पिंपळनेर | ५००/- रु | प्रमाणपत्र |
| उत्तेजनार्थ विभागून | श्रीमती लतिका चौधरी | दोंडाईचा | २५१/- रु | प्रमाणपत्र |
| उत्तेजनार्थ विभागून | प्रा. जगदीश वाघ | नवापूर | २५१/- रु | प्रमाणपत्र |


**सर्व पारितोषिक प्राप्त व स्पर्धक यांचे हार्दिक अभिनंदन**


Patil
zoom





nanasaheb subhash ahire
zoom






zoom


zoom


zoom


zoom





# बातमीचे कात्रण

पुण्यनगरी

## अहिराणी भाषेचे सांस्कृतिक वैभव जपा

### प्रा.दिलीप पाटील : खानदेश स्तरीय खुली ऑनलाईन अहिराणी काव्यवाचन स्पर्धा व काव्य संमेलन

**पिंपळनेर** : अहिराणी भाषा ही सांस्कृतिक वैभव जतन करणारी भाषा आहे. म्हणून या भाषेचे वैभव जतन करावे, असे प्रतिपादन प्रा. दिलीप पाटील यांनी केले.

कर्मवीर आ. मा. पाटील कला, वाणिज्य व कै. अण्णासो एन. के. पाटील विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय आणि कवयित्री बहीणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगावच्या विद्यार्थी विकास विभागाच्या संयुक्त विद्यमाने खानदेश स्तरीय खुली ऑनलाईन अहिराणी काव्यवाचन स्पर्धा व काव्य संमेलन घेण्यात आले. अध्यक्षस्थानी कॉलेज कमिटीचे चेअरमन धनराज जैन होते. यावेळी अहिराणी साहित्यिक सुभाष अहिरे, प्रा. एल. जी. सोनवणे, परीक्षक प्रा. डॉ. वा. ना. आंधळे, साहित्यिक रामदास वाघ उपस्थित होते. प्रा.दिलीप पाटील म्हणाले, अहिराणी ही लोकशाहीचा जिवंत झरा आहे. ती एकत्र कुटुंबाचा वारसा जपणारी, प्रेमळ, रसाळ, मधाळ भाषा आहे. पिंपळनेर महाविद्यालयाच्या या उपक्रमातून विद्यार्थ्यांमधील सृजनशील वृत्ती वाढीस लागून उत्तमोत्तम कवी निर्माण होतील. त्यांची ही पाऊलवाट आहे. त्याचा निश्चितच महामार्ग होईल, असा आशावाद त्यांनी व्यक्त केला. विद्यापीठाला बहिणाबाई चौधरींचे नाव दिले गेले. जगाच्या इतिहासात एका अशिक्षित महिलेचे नाव विश्वविद्यालयास देण्याची ही पहिलीच वेळ आहे, असेही ते म्हणाले.

सुभाष अहिरे यांनी जोपर्यंत आमच्या खानदेशी भाषिकाचा पेहराव, कष्टकऱ्यांचे दुःख, बापाचे कष्ट, मायचं जगणं हे पाठ्यपुस्तकांचे विषय होत नाही. तोपर्यंत अहिराणी भाषेला न्याय मिळणार नाही. हा न्याय देण्याचा प्रयत्न पिंपळनेर महाविद्यालय करीत असल्याचे सांगितले. प्रा. एल. जी. सोनवणे यांनी मानवी विकासामध्ये भाषेचे मोठे योगदान असते. बोली भाषा ही प्रमाण भाषेपेक्षा प्राचीन आहे. संस्कृत साहित्यात जे मांडले आहे. तेच जात्यावरच्या ओव्यांमध्ये आढळते. त्यामुळे अहिराणी ही समृद्ध भाषा आहे. परंतु काही शहरी किंवा शिक्षित लोक अहिराणी भाषिकाला गावंडळ, खेडवळ अथवा गावरान म्हणून हिणवत असतात. परंतु अहिराणीमध्ये सौंदर्य आह. तिच्यात एक सांस्कृतिक वैभव दडलेले आहे. जात्यावरच्या ओव्यांमध्ये स्त्री-पुरुष समानता, लिंग ाभाव या बाबी आढळतात. यावरून त्यांच्या द्रष्टेपणाची कल्पना येते. धनराज ेठ जैन म्हणाले यांनी मार्गदर्शन केले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे यांनी केले. याप्रसंगी परीक्षक प्रा.डॉ.वा.ना.आंधळे, रामदास वाघ, प्राचार्य डॉ.आर. आर.अहिरे यांनी केले. या स्पर्धेमध्ये नाशिक, जळगाव, धुळे व नंदुरबार या चारही जिल्ह्यांमधून एकूण २६ स्पर्धकांनी सहभाग नोंदविला. त्यात प्रथम क्रमांक प्रियंका पाटील (नवापूर), द्वितीय क्रमांक सुनिल पाटील (फागणे), तृतीय क्रमांक संदीप देसले (लोणखेडे) रुपाली चौधरी (पिंपळनेर), उत्तेजनार्थ लतिका चौधरी (दोंडाईचा) व प्रा. जगदीश वाघ (नवापूर) यांनी यश मिळविले. मान्यवरांचा परिचय प्रा.डॉ.संजय खोडके यांनी करून दिला. सूत्रसंचालन प्रा.डॉ.राम पेटारे केले. आभार प्रा.एल.जे.गवळी यांनी मानले.



# राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीदिनी शिक्षक दिनानिमित्त व्याख्यान

दि. : ०५ सप्टेंबर २०२० महाविद्यालय, पिंपळनेर, ता. साक्री. जि. धुळे (महाराष्ट्र) यांच्या आय. क्यु. ए. सी. व विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने भारताचे दुसरे राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीदिनी  शिक्षक दिनानिमित्त व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास पुणे येथील प्रसिद्ध शिक्षणतज्ञ माननीय डॉ. दिलीप देशमुख (पुणे) यांचे" आजची शिक्षण प्रणाली: शिक्षक, विद्यार्थी आणि समाज" या विषयांवर मार्गदर्शन लाभ . कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी पिंपळनेर एज्यू.सोसा. चे अध्यक्ष श्री. आर. एन. शिंदे हे उपस्थित होते.

शिक्षकांनी जास्तीत जास्त संवेदनशील झाले पाहिजे. आपली शिकविण्याची कला देखील बदलली पाहिजे. शिक्षकी पेशा हा पवित्र पेक्षा आहे. त्याचा अभिमान वाटावा असा पेशा आहे. आनंद देणारा हा पेशा आहे. शिक्षणाने जीवन सुसह्य झाले पाहिजे असेही ते म्हणाले.अध्यक्षीय भाषणात श्री. आर. एन. शिंदे म्हणाले की, कोरोनाच्या या पार्श्वभूमीवर शिक्षकांनी व संस्थाचालकांनी काळानुरुप स्वत:ला अपडेट ठेवायला पाहिजे म्हणजे अध्यापन - अध्ययन प्रक्रिया सुरळीत राहील.

प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे यांनी प्राचीन व आधुनिक शिक्षण प्रणाली यांचा ऊहापोह करतांना भविष्यकालीन शिक्षण व्यवस्था कशाप्रकारची असेल या संदर्भात मार्गदर्शन मिळावे हा ह्या कार्यक्रमाचा उद्देश आपल्या प्रास्ताविकातून विशद केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. संजय खोडके यांनी तर प्रमुख अतिथींचा परिचय व आभार प्रदर्शन डॉ. राम पेटारे यांनी केले. या कार्यक्रमासाठी पिंपळनेर एज्युकेशन सोसायटी संचलित सर्व आस्थापनावरील विद्याशाखांतील शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी १५७ श्रोते ऑनलाईन जॉईन झाले होते.

# दि. : ०५ सप्टेंबर २०२० रोजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीदिनी शिक्षक दिन

# माहीतीपत्रक

कवयित्री बहीणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,
जळगाव संलग्नीत

पिंपळनेर एज्यूकेशन सोसायटी संचलित, नॅक पुनर्मूल्यांकन 'ब' श्रेणी प्राप्त

## कर्म. आ. मा. पाटील कला, वाणिज्य व कै. अण्णासो एन. के. पाटील विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय, पिंपळनेर, ता. साक्री. जि. धुळे (महाराष्ट्र)

यांच्या आय. क्यु. ए. सी. व विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने आयोजित

भारताचे दुसरे राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीदिनी

## शिक्षक दिनानिमित्त व्याख्यान

## प्रमुख वक्ते: माननीय डॉ. दिलीप देशमुख (पुणे)

## विषय :- आजची शिक्षण प्रणाली: शिक्षक, विद्यार्थी आणि समाज

TOPIC:- PRESENT EDUCATIONAL SYSTEM: TEACHERS, STUDENTS AND SOCIETY

व्याख्यान दि. : ०५ सप्टेंबर २०२० वार : शनिवार वेळ : सकाळी ११.०० वा. स्थळ : झूम ॲप

## माननीय डॉ. दिलीप देशमुख, पुणे यांचा परिचय



### शिक्षण

M.Sc., M.Ed., B.J., A.V.P., M. Phil., Ph. D.

शिक्षण क्षेत्रात कार्य: ३१ वर्षे

साहीत्य: ३५ पुस्तकांचे लेखन

### शिक्षणतज्ञ मार्गदर्शक म्हणून अनेक संस्थांमध्ये कार्य

महाराष्ट्र मंडळ, पुणे विद्यापीठ, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, एस. एस. सी. बोर्ड, आय. आय. ई., बालभारती, एम. एस. एस. सी.आर., बी.ए.आर.सी. (मुंबई), टि.एफ.आय.आर., नॅशनल ओपन स्कूल (दिल्ली), भारतीय जैन संघटना, ए. आय. एम., डी. वाय. पाटील शिक्षण संस्था, दिशा अकॅडमी, एम.के.सी.एल., एक्सेल ग्रुप, हस्ती पब्लिक स्कूल

### प्रसिद्धी माध्यमांमध्ये कामे

दै. सकाळ, दै. प्रभात, दै. लोकमत, जीवन शिक्षण, शिक्षण संक्रमण इ. पुणे आकाशवाणी शैक्षणिक कार्यक्रम, ई टी. व्ही. अल्फा चॅनल, दूरदर्शन, बालचित्रवाणी तीन वर्षे शैक्षणिक काम

### समिती सदस्य

महाराष्ट्र राज्य अभ्यासक्रम समिती सदस्य, पुणे विद्यापीठ अभ्यासक्रम समिती सदस्य, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ शास्त्र विभाग प्रमुख, महाराष्ट्र राज्य कामगार कल्याण मंडळ सदस्य, महाराष्ट्रातील हजारो विद्यार्थी शिक्षक व पालकांना यशस्वी मार्गदर्शन

### शैक्षणिक प्रवास

इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, नेदरलँड, हॉलंड, बेल्जियम, ऑस्ट्रिया, स्वित्झलँड, इटली, व्हॅटिकन, सिंगापूर, मलेशिया, थायलँड, हॉंगकॉंग, बँकॉक, पटाया, नेपाळ, दुबई, अबुधाबी, शारजा

# प्रमुख उपस्थिती

## प्रमुख उपस्थिती



मा. डॉ. दिलीप देशमुख (पुणे)
प्रमुख वक्ते



मा. बाळासो आर. एन. शिंदे (अध्यक्ष, पि. ए. सो.)
कार्यक्रमाचे अध्यक्ष



डॉ. संजय पांडुरंग खोडके
(संयोजक, मो. क्र. 9420374077)



डॉ. राम काशिनाथ पेटारे
(समन्वयक, आय. क्यु. ए. सी.)



प्रा. जे. पी. अमृतकर
(सेवानिवृत्त प्राध्यापक)



प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे
(अध्यक्ष, संयोजन समिती)

व्याख्यान
दि. ०५ सप्टेंबर २०२०

वार: शनिवार

वेळ: सकाळी ११.०० वा.

स्थळ: झूम ॲप

## कार्यक्रमाची रूपरेषा

स्वागत

प्रास्ताविक: मा. प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे


अतिथींचा परिचय: डॉ. राम काशिनाथ पेटारे

अतिथींचे मनोगत
प्रमुख वक्ते: माननीय डॉ. दिलीप देशमुख (पुणे)

अध्यक्षीय मनोगत: मा. बाळासो आर. एन. शिंदे
(अध्यक्ष, पि. ए. सो.)

आभार: डॉ. राम काशिनाथ पेटारे

सुत्रसंचलन: डॉ. संजय पांडुरंग खोडके


zoom
Dr. Walmik Shirsath
realme 3
Redmi
indian Redmi

सकाळ

# शिक्षकांनो, अधिक संवेदनशील व्हा : प्रा. डॉ. दिलीप देशमुख

## पिंपळनेरला शिक्षक दिनानिमित्त ऑनलाइन व्याख्यान

**सकाळ वृत्तसेवा**

पिंपळनेर, ता. ६ : शिक्षकांनी जास्तीत जास्त संवेदनशील झाले पाहिजे. आपली शिकविण्याची कलाही बदलली पाहिजे, असे प्रतिपादन प्रा. डॉ. देशमुख यांनी केले. ते पिंपळनेर येथील कर्मवीर आ. मा. पाटील कला, वाणिज्य व (कै.) अण्णासाहेब एन. के. पाटील विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयातर्फे शिक्षक दिनानिमित्त ऑनलाइन कार्यक्रमात मार्गदर्शन करताना बोलत होते. पिंपळनेर एज्यु. सोसा.चे अध्यक्ष आर. एन. शिंदे अध्यक्षस्थानी होते.

डॉ. देशमुख म्हणाले, की विद्यार्थ्यांना समजेल असे शिकवा, लक्षात राहील असे सांगा. तसेच विद्यार्थ्यांनी शंका निर्माण केली पाहिजे



**पिंपळनेर : ऑनलाइन व्याख्यानात बोलताना प्रा. डॉ. दिलीप देशमुख (पुणे), प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे.**

म्हणजे खऱ्या अर्थाने शिक्षण सुरू झाले असे समजा. समाज-शिक्षक-विद्यार्थी-पालक आणि संस्थाचालक यांच्यात समन्वय असेल तर खऱ्या अर्थाने राष्ट्राची उन्नती होईल. शिक्षकी पेशा हा पवित्र असून त्याचा अभिमान वाटतो. आर. एन. शिंदे म्हणाले, की 'कोरोना'च्या पार्श्वभूमीवर शिक्षक व संस्थाचालकांनी काळानुरूप स्वतःला अपडेट ठेवायला पाहिजे, म्हणजे अध्यापन-अध्ययन प्रक्रिया सुरळीत राहील.

प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे यांनी प्राचीन व आधुनिक शिक्षणप्रणाली यांचा ऊहापोह करताना भविष्यकालीन शिक्षण व्यवस्था कशा प्रकारची असेल यासंदर्भात मार्गदर्शन मिळावे, हा या कार्यक्रमाचा उद्देश प्रास्ताविकातून विशद केला. कार्यक्रमाचे डॉ. संजय खोडके यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. राम पेटारे यांनी प्रमुख अतिथींचा परिचय करून दिला. केले. या कार्यक्रमासाठी पिंपळनेर एज्युकेशन सोसायटी संचलित सर्व आस्थापनावरील विद्याशाखांतील शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी ऑनलाइन उपस्थित होते.

---

लोकमत

**संडे अँकर ।** जिल्ह्यात सर्वदूर शिक्षक दिन विविध कार्यक्रमांनी साजरा, ऑनलाईन कार्यक्रमावर भर

# शिक्षकांनी अधिक संवेदनशील असायला हवे

लोकमत न्यूज नेटवर्क

**पिंपळनेर :** शिक्षकांनी जास्तीत जास्त संवेदनशील झाले पाहिजे. आपली शिकविण्याची कलादेखील बदलली पाहिजे, असे प्रतिपादन प्रा. डॉ. देशमुख यांनी केले. ते पिंपळनेर येथील कर्म. आ. मा. पाटील कला, वाणिज्य व कै. अण्णासाहेब एन. के. पाटील विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयाच्यावतीने शिक्षक दिनानिमित्त ऑनलाईन कार्यक्रमात मार्गदर्शन करताना बोलत होते. याप्रसंगी अध्यक्षस्थानी पिंपळनेर एज्यूकेशन सोसायटीचे अध्यक्ष आर. एन. शिंदे हे उपस्थित होते.

डॉ. देशमुख पुढे म्हणाले की विद्यार्थ्यांना समजेल असे शिकवा, लक्षात राहील असे सांगा. तसेच विद्यार्थ्यांनी शंका निर्माण केली पाहिजे. म्हणजे खऱ्या अर्थाने शिक्षण सुरु झाले असे समजा. समाज-शिक्षक- विद्यार्थी-पालक आणि संस्थाचालक यांच्यात समन्वय असेल तर खऱ्या अर्थाने राष्ट्राची उन्नती होईल. शिक्षकी पेशा हा पवित्र पेक्षा आहे. त्याचा अभिमान वाटावा असा पेशा आहे. आनंद देणारा हा पेशा आहे. शिक्षणाने जीवन सुसह्य झाले पाहिजे असेही ते म्हणाले.

अध्यक्षीय भाषणात आर. एन. शिंदे म्हणाले की, कोरोनाच्या या पार्श्वभूमीवर शिक्षकांनी व संस्थाचालकांनी काळानुरुप स्वत:ला अपडेट ठेवायला पाहिजे म्हणजे अध्यापन - अध्ययन प्रक्रिया सुरळीत राहील.

प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे यांनी प्राचीन व आधुनिक शिक्षण प्रणाली यांचा ऊहापोह करतांना भविष्यकालीन शिक्षण व्यवस्था कशाप्रकारची असेल या संदर्भात मार्गदर्शन मिळावे. हा या कार्यक्रमाचा उद्देश आपल्या प्रास्ताविकातून विषद केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. संजय खोडके यांनी तर प्रमुख अतिथींचा परिचय व आभार प्रदर्शन डॉ. राम पेटारे यांनी केले. पिंपळनेर एज्युकेशन सोसायटी संचलित सर्व आस्थापनावरील शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी ऑनलाइन उपस्थित होते.

### शिरपूरलाही कार्यक्रम

शिरपूर : रामसिंग नगर येथील आर. सी. पटेल मराठी प्राथमिक शाळेत शिक्षक दिन साजरा करण्यात आला. सर्वप्रथम शाळेचे मुख्याध्यापक आर. बी. खोंडे व ज्येष्ठ शिक्षिका श्रीमती एस. व्ही. सुर्वे यांनी प्रतिमा पूजन केले. त्यानंतर शाळेतील सर्व शिक्षकांचा पुष्पगुच्छ व पेन देऊन मुख्याध्यापकांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. शाळेतील उपशिक्षक दीपक महाजन यांनी शिक्षक या शब्दाचे महत्त्व आपल्या मनोगतातून व्यक्त केले. शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

### निजामपूरला ऑनलाईन कार्यक्रमात प्राचार्यांनी मांडले विचार

निजामपूर : डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन हे आदर्श शिक्षक होते. त्यांनी आपल्या जीवनकार्यातून शिक्षकांचे कर्तव्य व दिशा कशी असावी. जीवनात आपल्याला नि:स्वार्थपणे खूप काही करता येऊ शकते, असे प्रतिपादन शिक्षकदिनी प्राचार्य डॉ. अशोक खैरनार यांनी ऑनलाईन विचार मांडले. निजामपूर जैताणे शिक्षण प्रसारक मंडळाचे आदर्श कला महाविद्याय, निजामपूर-जैताणे, येथे ऑनलाईन माधमातून डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांना अभिवादन करुन शिक्षक दिन साजरा करण्यात आला.

या शिक्षक दिनानिमिताने महाविद्यालायचे प्राचार्य डॉ. अशोक खैरनार यांनी विद्यार्थांना मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या मनोगतात शिक्षक विद्यार्थ्यांच्या जीवनात महत्त्वपूर्ण भूमिका बजावीत असतात. सुशिक्षित भारत, हे प्रत्येक शिक्षकाचे स्वप्न असून आजच्या दिवशी त्यांचा सन्मान झाला पाहिजे. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. आपले जीवन कसे जगले आणि सर्व विश्वासाठी आदर्श ठरले. हे त्यांच्या जीवनाभूतीतून पटवून दिले. जीवनात त्यांनी हार मान्य केली नाही. सदर कार्यक्रमासाठी विद्यार्थांनी हिरिरीने आपला सहभाग नोंदविला. कोरोनाच्याच्या प्रादुभावनि निर्माण झालेली परिस्थिती आणि त्याचा शिक्षण क्षेत्रावर झालेला परिणाम यावर त्यांनी मनोगतातून विचार मांडले. विद्यार्थांनी खचून न जाता ऑनलाईन प्रवेश व शिक्षण घ्यावे आणि भविष्य उज्वल घडवावे, असे सुचविले. सूत्रसंचालन प्रा. अजबराव इंगळे यांनी केले. कार्यक्रमाला सर्व प्राध्यापक आणि प्राध्याकेत्तर वृंद व विद्यार्थी उपस्थित होते.

# ऑनलाइन परीक्षेला सामोरे जाताना करावयाची तयारी संदर्भात समुपदेशन कार्यशाळा




कवयित्री बहीणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव आयोजित

ऑनलाइन परीक्षेला सामोरे जाताना करावयाची तयारी संदर्भात

**समुपदेशन कार्यशाळा**

दिनांक : दि. १७/०९/२०२० वार : गुरुवार

वेळ : दु. ४.०० वा.

# परीक्षार्थी विद्यार्थ्यांची समुपदेशन कार्यशाळा

दि. १७/०९/२०२० वार गुरुवार रोजी महाविद्यालयातील परीक्षा विभाग व विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने परीक्षार्थी विद्यार्थ्यांसाठी **ऑनलाइन परीक्षेला सामोरे जाताना करावयाची तयारी संदर्भात समुपदेशन कार्यशाळा** आयोजित करण्यात आली. विद्यार्थी प्रथमच अशा प्रकारची ऑनलाईन परीक्षा देणार असल्याने त्यांच्या मनातील परीक्षेविषयीची भिती दूर करण्यासाठी सदर कार्यशाळा आयोजित करण्यात आली असे मनोगत प्रास्ताविकातून विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. डॉ. संजय खोडके यांनी व्यक्त केले.

ठाणबंदीच्या कालावधीत अंतिम वर्षाची परीक्षा घेण्याची सूचना कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांनी जाहीर केली. महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. एस. टी. सोनवणे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधतांना सांगीतले की, सदर परीक्षा या ०१ ऑक्टोबर ते ३१ ऑक्टोबर दरम्यान घेण्यात येणार आहे. या सर्व परीक्षा ऑनलाइन/ऑफलाईन पद्धतीने होणार आहेत. परीक्षेचे स्वरूप हे बहुपर्यायी प्रश्न (MCQ) या प्रकाराचे असणार आहे. प्रत्येक पेपर हा ६० गुणांचा असून त्यासाठी ९० मिनिटांचा कालावधी देण्यात येणार आहे. त्यामुळे परीक्षेला घाबरुन जाऊ नये असे आवाहन त्यांनी परीक्षार्थींना केले.

याप्रसंगी ऑनलाईन परीक्षा समन्वयक प्रा. डॉ. राम पेटारे, प्रा. के. डी. कदम, प्रा. डॉ. डब्लू. बी. शिरसाठ, प्रा. डी. बी. जाधव यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ही कार्यशाळा ऑनलाईन झुॅम ॲप च्या माध्यमातून संपन्न झाली.

# बातमीचे कात्रण

# पिंपळनेर महाविद्यालयात अंतिम वर्ष विद्यार्थ्यांसाठी समुपदेशन कार्यशाळा

**पिंपळनेर । प्रतिनिधी**




येथील कर्म आ. मा. पाटील कला, वाणिज्य व कै. अण्णासाहेब एन. के. पाटील विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थी विकास विभागा अंतर्गत अंतिम वर्षाच्या परिक्षार्थी विद्यार्थ्यांसाठी समुपदेशन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे म्हणाले की, करोनाच्या या भयग्रस्त परिस्थितीमध्ये आणि विद्यार्थ्यांच्या मनामध्ये असलेल्या परीक्षेचा ताण या कुठल्याही गोष्टीला घाबरू नका. आत्मविश्वास डळमळीत होऊ देऊ नका, परीक्षेला धैर्याने सामोरे जा असे आवाहन त्यांनी परीक्षार्थी विद्यार्थ्यांना केले. या कार्यशाळेस दहिवेल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. डी. बोरसे हे ऑनलाईन उपस्थित होते. सदर परीक्षा या ०१ ऑक्टोबर ते ३१ ऑक्टोबर दरम्यान होणार आहेत. या सर्व परीक्षा ऑनलाइन/ऑफलाईन पद्धतीने होतील. विद्यार्थ्यांचे मनोबल वाढविण्यासाठी या कार्यशाळेत प्रा. के. आर. राऊत, प्रा. पी. एम. सावळे, प्रा. एम. व्ही. बळसाणे, प्रा. सी. एन. घरटे, डॉ. राम पेटारे, डॉ. डब्ल्यू. बी. शिरसाठ यांनी विद्यार्थांना मार्गदर्शन केले. या कार्यशाळेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे मनोबल निश्चित उंचावेल असा आशावाद प्राध्यापकांनी व्यक्त केला.

# बातमीचे कात्रण

## विद्यार्थ्यांसाठी आज कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

**पिंपळनेर :** येथील कर्म आ. मा. पाटील कला, वाणिज्य व कै. अण्णासाहेब एन. के. पाटील विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षार्थींसाठी १७ सप्टेंबर रोजी समुपदेशन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यशाळेत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे व प्राध्यापक परीक्षार्थींशी संवाद साधणार आहेत. ही कार्यशाळा झूम ॲपद्वारे १७ रोजी सायंकाळी ४ वाजता होणार आहे. यात विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन केले आहे.

सकाळ

## पिंपळनेर महाविद्यालयात आज कार्यशाळा

**पिंपळनेर :** येथील कर्मवीर आ. मा. पाटील कला, वाणिज्य व कै. अण्णासाहेब एन. के. पाटील विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयाच्या अंतिम वर्षाच्या परिक्षार्थींसाठी उद्या (१७ सप्टेंबर) समुपदेशन कार्यशाळा होत आहे. ऑनलाइन/ऑफलाइन पद्धतीने होणाऱ्या परीक्षांबाबत मार्गदर्शन होईल. प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे व प्राध्यापक परीक्षार्थींशी संवाद साधणार आहेत. ही कार्यशाळा ऑनलाइन झूम ॲपच्या माध्यमातून खालील लिंकवर दुपारी चारला होईल. महाविद्यालयातर्फे https://us02web.zoom.us/j/81399511539?pwd=RlB5U3RsU0tRTmo3QllTZ1N1UVB1dz09 **Meeting ID:** 813 9951 1539 आणि Passcode: 12345 असा असेल.

लोकमत

# विद्यार्थ्यांनी परीक्षेला धैर्याने सामोरे जावे

## प्राचार्य एस.टी.सोनवणे : समुपदेशन कार्यशाळेत केले आवाहन

लोकमत न्यूज नेटवर्क

**पिंपळनेर:** कोरोनाच्या या भयग्रस्त परिस्थितीमध्ये आणि विद्यार्थ्यांच्या मनामध्ये असलेल्या परीक्षेचा ताण या कुठल्याही गोष्टीला घाबरू नका. आत्मविश्वास डगमळीत होऊ देऊ नका, परीक्षेला धैर्याने सामोरे जा, असे आवाहन प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे यांनी केले.

येथील कर्म. आ. मा. पाटील कला, वाणिज्य व कै. अण्णासाहेब एन. के. पाटील विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थी विकास विभागांतर्गत अंतिम वर्षाच्या परिक्षार्थी विद्यार्थ्यांसाठी समुपदेशन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.त्यावेळी प्राचार्य डॉ. सोनवणे बोलत होते.

परीक्षा या ०१ ऑक्टोबर ते ३१ ऑक्टोबर दरम्यान होणार आहेत. या सर्व परीक्षा ऑनलाईन/ऑफलाईन पद्धतीने होतील. दरम्यान या कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढला आहे.

कार्यशाळेस दहिवेल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. डी. बोरसे हे ऑनलाईन उपस्थित होते.

विद्यार्थ्यांचे मनोबल वाढविण्यासाठी या कार्यशाळेत प्रा. के. आर. राऊत, प्रा. पी. एम. साबळे, प्रा. एम. व्ही. बळसाणे, प्रा. सी. एन. घरटे, डॉ. राम पेटारे, डॉ. डब्ल्यू. बी. शिरसाठ यांनी विद्यार्थांना मार्गदर्शन केले.ऑनलाईन कार्यशाळेत एकूण १६७ विद्यार्थी / विद्यार्थिनी, महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी सहभागी झाले होते.

Hello Dhule
Page No. 2 Sep 19, 2020
Powered by: erelego.com

# बातमीचे कात्रण

देशदूत

पांझराकान खोरे...

२९।९।२०२०

## विद्यार्थ्यांनी परीक्षेला धैर्याने सामोरे जावे-प्राचार्य डॉ. सोनवणे

### पिंपळनेर महाविद्यालयात अंतिम वर्ष विद्यार्थ्यांची समुपदेशन कार्यशाळा

■ पिंपळनेर । वार्ताहर

कोरोनाच्या या भयग्रस्त परिस्थितीत विद्यार्थ्यांनी परीक्षेचा ताण घेवु नये. आत्मविश्वास डळमळीत होऊ न देता परीक्षेला धैर्याने सामोरे जावे, असे आवाहन प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे यांनी केले.

येथील कर्म आ.मा. पाटील कला, वाणिज्य व कै. अण्णासाहेब एन. के. पाटील विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थी विकास विभागातंर्गत अंतिम वर्षाच्या परिक्षार्थी विद्यार्थ्यांसाठी समुपदेशन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. कार्यशाळेत दहिवेल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी. डी. बोरसे हे ऑनलाईन उपस्थित होते. परीक्षा १ ऑक्टोबर ते ३१ ऑक्टोबर दरम्यान होणार आहेत. या सर्व परीक्षा ऑनलाइन/ऑफलाईन पद्धतीने




होतील. परीक्षेचे स्वरूप हे वस्तुनिष्ठ प्रकारचे बहुपर्यायी प्रश्न या स्वरूपाचे असणार आहे. पदवी परिक्षेसाठी प्रत्येक पेपर हा ६० गुणांचा असून त्यासाठी ९० मिनिटांचा कालावधी देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी आपला मोबाईल रिचार्ज करून ठेवावा. जेथे चांगले नेटवर्क चांगले असेल तेथे जाऊन परीक्षा द्यावी, अशा सूचनाही देण्यात आल्यात. यावेळी विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन देखील करण्यात आले.

विद्यार्थ्यांचे मनोबल वाढविण्यासाठी या कार्यशाळेत प्रा.के.आर. राऊत, प्रा.पी. एम. सावळे, प्रा.एम.व्ही. बळसाणे, प्रा.सी. एन. घरटे, डॉ. राम पेटारे, डॉ.डब्ल्यू.बी. शिरसाठ यांनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे मनोबल निश्चित उंचावेल, असा आशावाद प्राध्यापकांनी व्यक्त केला. कार्यशाळेत एकूण १६७ विद्यार्थी/ विद्यार्थीनी, महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी ऑनलाईन सहभागी झाले होते. कार्यशाळेचे संयोजन व सुत्रसंचलन विद्यार्थी विकास अधिकारी डॉ.संजय खोडके यांनी केले. तर आभार प्रोफेसर डॉ. बी.सी. मोरे यांनी मानले.

# वाचन प्रेरणा दिन कार्यक्रमाचा अहवाल

## दि. १५ ऑक्टोबर २०२०

कवयित्री बहीणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव संलग्नीत पिंपळनेर एज्यूकेशन सोसायटी संचलित, कर्म. आ. मा. पाटील कला, वाणिज्य व कै. अण्णासो एन. के. पाटील विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय, पिंपळनेर, ता. साक्री. जि. धुळे (महाराष्ट्र) यांच्या विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने आयोजित **माजी राष्ट्रपती स्वर्गीय डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम** यांचा जन्मदिवस **'वाचन प्रेरणा दिन'** म्हणून साजरा आला.

याप्रसंगी प्रमुख अतिथी व मार्गदर्शक म्हणून मराठी अभ्यास मंडळ, कबचौ उमवि, जळगाव चे माजी अध्यक्ष **माननीय प्रा. एल. जी. सोनवणे** तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे **प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे** उपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणून कॉलेज कमिटीचे चेअरमन श्री. धनराज राजमल जैन, साक्री महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. अहिरे, प्रा. डॉ. एल. बी. पवार, प्रा. डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण हे उपस्थित होते.

आपल्या मनोगतातून प्रा. एल. जी. सोनवणे म्हणाले की, वाचन म्हणजे पुस्तक आणि मस्तक यांचा मेळ होय. वाचनातून जीवनाकडे बघण्याची दृष्टी मिळते. भविष्यातील सर्व आव्हानांना सामोरे जाण्याची क्षमता विकसित होते. अनेक जगप्रसिद्ध विचारवंतांच्या लिखाणातून महापुरुषांना जीवनाची दिशा कशी सापडली हे त्यांनी म. गांधीजी, म. फुले, उत्तम कांबळे, प्रतापराव पवार, अण्णा हजारे यांचे उदाहरण देत स्पष्ट केले. तसेच आजच्या ह्या भेदाभेदीच्या काळात माणुसकीच्या एकत्वाचा संदेश हा ग्रंथातून मिळतो असेही ते म्हणाले.

अध्यक्षस्थानावरून बोलताना प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे म्हणाले की, जगात तंत्रज्ञान प्रगत झाले आहे परंतु वाचन संस्कृती लोप पावत चाललेली आहे अशी खंत त्यांनी व्यक्त केली. वाचनाने माणसांमध्ये असलेली नकारात्मकता जाऊन सकारात्मकता येते. वाचनाने मनुष्य समृद्ध होतो. त्यातून जीवन जगण्याची कौशल्य त्याला मिळू शकतात. वाचनाने संवादकौशल्य विकसित होते. विद्यार्थ्यांनी या वाचन संस्कृतीचे पाईक झाले पाहिजे असे आव्हान त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना केले. याप्रसंगी पिंपळनेर महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी तसेच पिंपळनेर एज्युकेशन सोसायटी संचलित सर्व शाखांमधील मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी /विद्यार्थिनी ऑनलाईन जॉईन झाले होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. डॉ. संजय पांडुरंग खोडके यांनी केले. तर आभार प्रदर्शन प्रा. व्ही. जी. उगलमुगले यांनी केले.

# कार्यक्रमाची रूपरेषा

## बातमीचे कात्रण

कवयित्री बहीणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,
जळगाव संलग्नीत
